सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ क्र. विविमं/२०२६–२७/४२८ दिनांक : २२/१०/२०२६

प्रति,
**मा. प्राचार्य/मा. संचालक/मा. विभागप्रमुख,**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग.

**विषय : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यस्तरीय वैचारीक अभिवादन परीक्षेच्या आयोजनाबाबत.**
**संदर्भ** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनिअर्स, नागपूर यांचे २२३/बानाई/नागपूर/२०२६ दिनांक ११/१०/२०२६ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनिअर्स, नागपूर यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यस्तरीय वैचारीक अभिवादन परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी सदर उपक्रमात महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना सहभागी होण्याबाबत प्रोत्साहित करावे. तसेच आपल्या महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था/ विभागातील मुख्य सूचना फलकावर सदर पत्र प्रदर्शित करुन विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून देण्याबाबत संबंधितास सूचित करावे, कळावे ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे

(डॉ. सविता कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

# Dr. Babasaheb Ambedkar

## NATIONAL ASSOCIATION OF ENGINEERS

NAGPUR . BRANCH





Registration No. M/S/BOM/655/G.B.B.S.D./Dated 1.8.1988 and Registration No. F 12721 Bombay
80 G F No. CIT-I/Tech./80G/D32/2014-15 Date 03/06/2014



**Office** : Dr. Babasaheb Ambedkar Sanskrutik Bhavan, Uroovela Colony, Wardha Road, Nagpur-15.
**E-mail** : banaenagpur1@gmail.com, drbanae@gmail.com **Website** : https://banaenagpur.com **Phone** : 2258208, 9422900460



**EXECUTIVE COMMITTEE**
**2025 - 2027**

**PRESIDENT**
Er. Arvind S. Gedam
Mob. : 9422111738

**VICE-PRESIDENT**
Er. Ajay R. Sawatkar
Mob. : 9422508050

**SECRETARY**
Er. Jayant A. Ingle
Mob. : 9423412317

**JOINT SECRETARY**
Er. Nilesh R. Nakhale
Mob. : 8600047671

**TREASURER**
Er. Satish B. Telang
Mob. : 9404081886

**INTERNAL AUDITOR**
Er. Sharad Kumar Ghodke
Mob. : 7004657001

**MEMBERS**
Er. Vijay Khaparde
Mob. : 9923593301

Dr. Jyotsna W. Chavhan
Mob. : 9423634733

Er. Mahendra Jiwane
Mob. : 9890125110

**STATE EXECUTIVE COMMITTEE REPRESENTATIVE**

**Vice President**
Er. Bhaskar Khobragade
Mob. : 9029225337

**Organising Secretary**
Er. Shailesh Tembhurnikar
Mob. : 9823142052


Ref. No. २२३/बानाई/नागपूर/२०२६ दिनांक/Date १-०८-२०२६

प्रती,

मा. डॉ. सुरेश गोसावी,
कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे

विषय : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमित्त राज्यस्तरीय वैचारिक अभिवादन परीक्षेचे आयोजन आपले विद्यापीठ अधिनस्त महाविद्यालयातून जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी करून घेण्यासाठी सर्व संबधित यंत्रणांना निर्देशित करण्याबाबत..

मा. महोदय,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनिअर्स नागपूर ही संस्था विद्यार्थ्यांमध्ये दिवसेंदिवस कमी होत असलेली वाचनाची आवड वृद्धींगत व्हावी, संशोधनात्मक विवेचन आणि विश्लेषणाची रुची वाढून त्यांच्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या पुस्तकांची समीक्षा करण्याची पात्रता निर्माण व्हावी व त्या माध्यमातून भारतीय राज्यघटनेचे संवर्धन व्हावे यासाठी विविध उपक्रमांद्वारे प्रयत्न करीत आहे. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षेला सामोरे जाण्याची पात्रता निर्माण होऊन एक जबाबदार नागरिक बनण्याच्या दृष्टीने त्यांची वाटचाल सुरू व्हावी यासाठी सन २०१३ पासून सतत प्रयत्नशील आहे. सन २०२७ हे वर्ष महाड क्रांतीचे शताब्दी वर्ष असल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण दिनी "महाड मुक्ती संग्राम" आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर आधारित राज्यस्तरीय वैचारिक अभिवादन परीक्षेचे आयोजन राज्यातील शाळा / महाविद्यालयांच्या माध्यमातून करीत आहोत.

" परीक्षेचे वेळापत्रक आदी, इतर तपशील संलग्न आहे."

आपणास विनंती करण्यात आहे की आमच्या संस्थेमार्फत दि. ७ डिसेंबर २०२६ ला होणाऱ्या वैचारिक अभिवादन परीक्षेत सहभागी होण्यासाठी आपल्या अधिनस्त सर्व स्तरावरील अधिकारी तथा महाविद्यालये यांचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य यांना निर्देशित करण्याची विनंती आहे, आणि तसे संस्थेला अवगत करण्याची तसदी घ्यावी ही नम्र विनंती.

वरील उपक्रमासाठी आजतागायत च्या सहकार्या बद्दल आम्ही आपले मन:पूर्वक आभार मानतो व याही वर्षी आपल्या बहुमुल्य सहकार्याची अपेक्षा करतो.

आपला स्नेहांकित

( इंजी. जयंत इंगळे )
सचिव, बानाई नागपूर

सहपत्र : वैचारिक अभिवादन परीक्षा (२०२६) चे तपशील

# Dr. Babasaheb Ambedkar
## NATIONAL ASSOCIATION OF ENGINEERS
NAGPUR - BRANCH

Registration No. M/S/BOM/455/G.B.B.S.D /Dated 1.8.1988 and Registration No. F 12721 Bombay
80 G F. No. CIT-I/Tech /80G/D32/2014-15 Date 03/06/2014





**Office :** Dr. Babasaheb Ambedkar Sanskrutik Bhavan, Uroovela Colony, Wardha Road, Nagpur-15.
**E-mail :** banaenagpur1@gmail.com, drbanae@gmail.com **Website :** https://banaenagpur.com **Phone :** 2250208, 9422900460



**EXECUTIVE COMMITTEE 2025 - 2027**

**PRESIDENT**
Er. Arvind S. Gedam
Mob. : 9422111738

**VICE-PRESIDENT**
Er. Ajay R. Sawatkar
Mob. : 9422508050

**SECRETARY**
Er. Jayant A. Ingle
Mob. : 9423412317

**JOINT SECRETARY**
Er. Nilesh R. Nakhale
Mob. : 8600047671

**TREASURER**
Er. Satish B. Telang
Mob. : 9404081886

**INTERNAL AUDITOR**
Er. Sharad Kumar Ghodke
Mob. : 7004657001

**MEMBERS**
Er. Vijay Khaparde
Mob. : 9923593301

Dr. Jyotsna W. Chavhan
Mob. : 9423634733

Er. Mahendra Jiwane
Mob. : 9890125110

**STATE EXECUTIVE COMMITTEE REPRESENTATIVE**

**Vice President**
Er. Bhaskar Khobragade
Mob. : 9029225337

**Organising Secretary**
Er. Shailesh Tembhurnikar
Mob. : 9823142052


Ref. No. स्मरणपत्र/बानाई/नागपूर/२०२६ दिनांक : Date ११-१०-२०२६

प्रती,

मा. डॉ. सुरेश गोसावी,
कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे

विषय : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमित्त राज्यस्तरीय वैचारिक अभिवादन परीक्षेचे आयोजन विद्यापीठ अधिनस्त महाविद्यालयातून घेण्यासाठी सर्व संबधित यंत्रणांना निर्देशित करण्याबाबत..

संदर्भ : आमचे पत्र क्र. २२३/बानाई/नागपूर/२०२६. दि.३१-०८-२०२६ चे उपरोक्त संदर्भीय पत्राची प्रत आपणास प्रदान करण्यात आलेली आहे. सुलभ संदर्भाकरिता ती प्रत पुनःच्छ या पत्रासोबत पाठविण्यात येत आहे.

महोदय,

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी घेण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय वैचारिक अभिवादन परीक्षेची अंतिम तारीख ०४-११-२०२६ असल्याने फार थोडे दिवस नोंदणी करिता शिल्लक असल्याने संदर्भीय पत्रानुसार आपण आपले स्तरावरून आपल्या अधिनस्त सर्व स्तरावरील अधिकारी व यंत्रणांना सर्व महाविद्यालयांना परीक्षेत सहभागी होण्यासाठी निर्देश देवून अवगत करावे व एक प्रत आम्हास पुरविण्याची तसदी घ्यावी.

" परीक्षेचे वेळापत्रक आदी, इतर तपशील संलग्न आहे."

आपला स्नेहांकित

( इंजि. जयंत इंगळे )
सचिव, बानाई नागपूर

सहपत्र :
१) आमचे पत्र क्र. २१२/बानाई/नागपूर/२०२६. दि.२८-०८-२०२६ प्रत
२) वैचारिक अभिवादन परीक्षा (२०२६) चे तपशील

डॉ.बाबाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनीअर्स नागपूर द्वारा आयोजित

पत्ता :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, उरुवेला कॉलनी, वर्धारोड, नागपूर -२५

E – Mail :drbanae@gmail.com , website www.banaengp.com ,PhoneNo 0712-2250208 , 2250859

# राज्यस्तरीय वैचारिक अभिवादन प्रश्नोत्तरी स्पर्धा परीक्षा – २०२६

## डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिना निमित्य

प्रवेश नोंदणी अंतिम तारीख – ०४/११/२०२६ परीक्षा दिनांक – ७/१२/२०२६ सोमवार वेळ :- १० : ३० ते १२.००

### पारितोषिके

| | | | |
|---|---|---|---|
| अ गट | प्रथम २००००/- | द्वितिय १३००० /- | तृतीय १००००/- |
| ब गट | प्रथम २५०००/- | द्वितिय १८०००/- | तृतीय १५०००/- |

प्रोत्साहनपर बक्षिसे :- प्रत्येकी १०००/ - रु. प्रमाणे ५ बक्षिसे ( दोन्ही गटाकरिता )

## स्पर्धा परीक्षा अभ्यासक्रम

**गट अ**

१) महाडचा मुक्ती संग्रामावर आधारित
BANAE Nagpur यु ट्यूब चॅनलवरील ऑडीओ बुक
( चॅनल सबस्क्राईब करणे अनिवार्य )

२) भारतीय संविधान (सर्वसाधारण माहिती ) आणि
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनचरित्र (संक्षिप्त )

**गट ब**

१) द्वितीय महायुद्ध आणि डॉ. आंबेडकर
लेखक- अॅड. विमलसूर्य चिमणकर
मराठी पुस्तकावर आधारित (पुस्तक विकत घेणे अनिवार्य)

२) भारतीय संविधान व मुलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तत्त्वे

### परीक्षेचे स्वरूप

वरील यु ट्यूब ऑडीओ व वरील पुस्तकावर आधारित वस्तुनिष्ठ परीक्षा - १०० गुण वेळ १.३० तास

गट अ वर्ग ७ ते १० परीक्षा शुल्क ५०/- रु.

गट ब कनिष्ट महाविद्यालय (११ वी व १२वी ), आय.टी. आय., तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी, वैद्यकीय, औषधी शास्त्र, सर्व पदविका व पदवी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी ,

परीक्षा शुल्क १५०/- रु. ( द्वितीय महायुद्ध आणि डॉ. आंबेडकर या पुस्तक शुल्कासह )

परीक्षा शुल्क् त्या त्या शाळा/महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे कडे जमा करून चेक/डी.डी. बानाई इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्पुटर एज्युकेशन नागपूर चे नावे पाठवावे. अथवा रक्कम ऑन लाईन पद्धतीने दिलेल्या निर्देशाप्रमाणे किंवा रोखीने अदा करावी. सुलभ संदर्भाकरिता खाते क्रमांक 10371309192 IFC Code SBIN0008239 मधे किंवा दिलेले QR Code स्कॅन करावा व ९४२२९००४६० या संपर्क क्रमांकावर स्क्रीन शॉट किंवा डिपाझीट स्लिपवर शाळा महाविद्यालयाचे नाव व संपर्क क्रमांक यांच्या उल्लेखासह whatsapp करावा.

विनीत

| | | | | |
|---|---|---|---|---|
| इंजि. अरविंद गेडाम | इंजि. अजय सावतकर | इंजि. जयंत इंगळे | इंजि. निलेश नाखले | इंजि.सतीश तेलंग |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव | सहसचिव | कोषाध्यक्ष |
| इंजि. शरद घोडके | इंजि. विजय खापर्डे | इंजि. महेंद्र जीवने | इंजि. ज्योत्सना चव्हाण | |
| आंतर तपासणीस | सदस्य | सदस्य | सदस्य | |

# अभिवादन परीक्षेच्या नियम व अटी

१) परीक्षेची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला माल्ल्यार्पण करून दि. ७ डिसेंबर २०२६ सोमवार रोजी सकाळी १०.३० ते १२.०० या वेळेत निवडलेल्या केंद्रातून करावी. परीक्षा केंद्रात बदल करण्याचे व आयोजन ते परीक्षा निकालासंबंधी सर्व निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार बानाई नागपूर चे असतील.

२) ही परीक्षा वस्तुनिष्ठ (Objective) स्वरुपाची आहे तेव्हा परीक्षार्थीनी "द्वितीय महायुद्ध आणि डॉ. आंबेडकर" लेखक- अँड. विमलसूर्य चिमणकर हे पुस्तक आणि BANAE Nagpur You Tube Channel वरील महाड क्रांती संग्रामावर आधारित ऑडीओ बुक याचा **सविस्तर अभ्यास करणे अपेक्षित आहे. युट्युब चॅनल "सबस्क्राईब" करणे अनिवार्य राहील. परीक्षा ऑफ लाईन राहील. शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना BANAE YouTube Channel Subcribe करायला अनिवार्य करावे.**

३) परीक्षेचे माध्यम गट-अ आणि गट-ब साठी मराठी असेल.

४) प्रश्न्नपत्रिका व उत्तरपत्रिका परीक्षा केंद्रावर परीक्षेच्या वेळीच पुरविण्यात येईल. उत्तरपत्रिका संगणकीय असल्याने परीक्षार्थिनी त्यावर अ/ब/क/ड पैकी फक्त एका अचूक उत्तरावर केवळ बालपेन द्वारे दाट गोल ● करायचा आहे. प्रश्न्नोत्तरी परीक्षा -१०० गुणाची असेल.

५) ही परीक्षा जवाहर नवोदय विद्यालये, औदयोगिक प्रशिक्षण संस्था, तंत्रनिकेतनसह सर्व शाळा महाविद्यालयातून आयोजित केली जात आहे. बानाई जिल्हा शाखा या परीक्षेची समन्वयक आहे.

६) सर्व शाळा / महाविद्यालया मार्फत सहभागी विद्यार्थ्यांची यादी दिलेल्या **Excel Sheet Format** मध्ये **Email- drbanae@gmail.com** या संकेतस्थळी पाठवणे आवश्यक आहे.

७) ही स्पर्धा त्यांच्या शाळा / महाविद्यालयाच्या मुख्यध्यापक / शिक्षक / प्राचार्य – प्राध्यापक यांचे देखरेखीखाली घेण्यात येईल.

८) बक्षिसाची रक्कम विजेत्या स्पर्धकांना A/C Payee चेक द्वारे दिली जाईल. विशेष पारितोषिक – बानाई चे ज्येष्ठ सदस्य इंजि. नरेंद्र ताकसांडे आणि परिवारातर्फे निकष पात्र स्पर्धकांना त्यांचा पदवी परीक्षे पर्यंत विराज ताकसांडे स्मृती शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येईल.

९) या पूर्वी वैचारिक अभिवादन परीक्षेत विजेते ठरलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी पात्र ठरविण्यात येणार नाही.

१०) वैचारिक अभिवादन परीक्षेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थी – प्राध्यापक, मुख्याध्यापक , शिक्षक , प्राचार्य यांना ऑनलाइन रित्या सहभागी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल. त्यामुळे Excel Sheet format सादर करतांना सर्व संबंधिताचे संपर्क क्रमांक सदर यादी मध्ये समावेश असल्याची खातरजमा करून घ्यावी .

**खाते क्रमांक 10371309192 IFC Code SBIN0008239 मधे किंवा दिलेले QR Code स्कॅन करावा**

**परीक्षा आयोजन समिती – बानाई कार्यकारिणी, नागपूर**